अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

मंगळवार,दि. २८ नोव्हेंबर २०२३





## अखेर शिक्कामोर्तब! हार्दिक पांड्या पुन्हा एकदा मुंबईच्या ताफ्यात

**मुंबई** : गुजरातचा कॅप्टन हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्समध्ये परतण्याव शिक्कामोर्तब झालं आहे. मुंबई इंडियन्सकडून आणि आयपीएलकडून अधिकृतरित्या घोषणा करण्यात आल्याने गेल्या महिनाभरापासून सुरु असलेल्या चर्चांनाही पूर्णविराम मिळाला आहे. गेल्या २४ तासांमध्येही बऱ्याच नाट्यमय घडामोडी घडल्या होत्या. त्यामुळे हार्दिक सांगा कोणाचा? हे विचारायची वेळ आयपीएल चाहत्यांवर आली होती. संघाच्या मालकीण अंबानी हार्दिकच्या घरवापसीवर म्हणाल्या की, इंडियाचा स्टार बनण्यापर्यंत, हार्दिकने मजल मारली आहे. आम्ही पुन्हा एकदा हार्दिकचे स्वागत करत आहोत.




# हत्तूरमध्ये घरगुती गॅसचा स्फोट; घरातील चौघे जखमी

- पहाटेच्या आवाजाने गाव हादरले
- हादऱ्याने घर झाले जमीनदोस्त

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर येथे सोमवारी पहाटे घरगुती गॅसचा स्फोट झाला. त्यात घरातील चारजण जखमी झाले. साडेपाच वाजण्याच्या सुमारास लहान मुलीसाठी आईकडून दूध गरम करताना ही दुर्घटना घडली.स्फोटाचा आवाज इतका भीषण होता की,संपूर्ण घराच्या भिंती पडून गेल्या.घरातील सामानांची नासधूस झाली. या स्फोटाने संपूर्ण गाव हादरून गेले. आहे. जखमींना सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.**





या घटनेची पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की- सोलापूर- विजयपूर रस्त्यावरील हत्तुर येथील शावरसिद्ध सिद्धप्पा बळुरे यांच्या राहत्या घरी सिलेंडरचा स्फोट झाला.यात सुदैवाने जिवित हानी झाली नाही. यामध्ये शावरसिद्ध सिद्धप्पा बळुरे (वय-७०) सुनील सोनाली महादेव बळुरे (वय - २८) आरुषी महादेव बळुरे (वय - ३ वर्ष) आणि मलकारी महादेव बळुरे व्दवय -१) वर्ष हे चौघे जखमी झाले आहेत. या गॅस सिलेंडरच्या स्फोटात संपूर्ण घर उद्ध्वस्त झाले असून जखमींना सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. सदर घटनास्थळी डिव्हिजन दोनचे ए.सी.पी मोरे, विजापूर रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाघचौरे मंद्रूप अप्पर तहसील कार्यालयाचे तहसीलदार राजशेखर लिंबारे एम.के.फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी सांत्वनपर भेट दिली व फाउंडेशन व शासनाच्या माध्यमातून मदत करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

### मदतीचे आश्वासन

हत्तुर येथील घटनेची माहिती मिळतात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, जिल्हा उपप्रमुख आणप्पा सत्तूबर यांनी घटनास्थळी भेट दिली.मुख्यमंत्री सहायता निधीचे अधिकारी यांना फोन लाऊन सदर घटनेची माहिती दिली. सदर जखमींना शासकीय,खाजगी रुग्णालयात दाखल करा, मुख्यमंत्री सहायता निधीतून निधी दिले जाईल, असे आश्वासन दिले. बबुरे यांनी येथील उपचारासाठी दाखल केले आहे.

### गॅस पाईप लिकेज असावा...

सदर घटना कोणत्या कारणामुळे घडली याबद्दल कोणालाही काही माहिती नसल्याचे ग्रामस्थांकडून सांगताना गॅसचा पाईप लिकेज झाल्यानेच हा प्रकार घडला असावा, अशी चर्चा प्रत्यक्षदर्शीमधून सांगण्यात येत आहे.

---



## त्रिपुरारी पौर्णिमाः न्यासाचा परिसर उजळला दिव्यांनी

सुराज्य/अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ व न्यासाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या हिरकणी सखी मंच्याकडून त्रिपुरारी पौर्णिमेनिमित्त न्यासाच्या प्रांगणात भव्य दीपोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. लख..! लख. !! दिव्यांनी न्यासाचा परिसर उजळून निघाला होता.

दरम्यान न्यासाच्या प्रांगणात महाप्रसाद गृह समोरील कपिला गाय येथे दीप लाऊन भव्य दीपोत्सव साजरा करण्यात आला. दरम्यान न्यासाच्या यात्री निवास येथे कोल्हापूर येथील भक्ती गंध सेवा प्रतिष्ठानच्यावतीने रांगोळी साकारून लक्ष दीपोत्सव साजरा करण्यात आला.

याप्रसंगी अध्यक्षा अलकाताई भोसले, उपाध्यक्षा रत्नमाला मचाले, सचिवा अर्पिताराजे भोसले, खजिनदार स्मिता कदम, सुवर्णा घाडगे, स्वप्ना माने, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव श्यामराव मोरे उपस्थित होते. न्यासाचे अध्यक्ष जन्मेंजयराजे भोसले, अमोलराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा झाला.

### आरोग्य मंत्री तानाजी सावंत भडकले...

## मराठा समाज आरक्षणप्रकरणी पत्रकारांनी आगीत तेल ओतू नये

सुराज्य/पुणे

मराठा आरक्षणाबाबत महाराष्ट्रात काय चालले आहे हे आपण सर्वजण पाहत आहोत. पत्रकारांनी आगीत तेल ओतू नये, अशा शब्दांत राज्याचे आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत हे मराठा आरक्षणाबाबत काय वाटते या प्रश्नावर पत्रकारांवर पुण्यात भडकले.

एका कार्यक्रमानंतर डॉ. सावंत यांना माध्यमांनी विविध मुद्यांवर प्रश्न विचारले. मराठा आरक्षणासंदर्भात डॉ. सावंत यांनी 'मराठा समाजाला २०२४ पर्यंत आरक्षण मिळाले नाही तर मी राजीनामा देईन', असे वक्तव्य पूर्वी केल्याची आठवण करून देत प्रश्न विचारता ते टाळून निघून जात होते. तेव्हा पत्रकारांनी पुन्हा 'तुम्ही मराठा आरक्षणाच्या मुद्यांवरून पळ काढताय का,' असा प्रतिप्रश्न केला. त्यावेळी निघून जात असलेले डॉ. सावंत पुन्हा संबंधित पत्रकाराजवळ आले आणि त्यांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवत 'शांत राहा', असे सांगितले.



त्यावर 'महाराष्ट्रात आरक्षणाच्या मुद्यांवरून काय चालले आहे ते तुम्ही आम्ही पाहत आहोत. त्यामुळे पत्रकारांनी त्या आगीत तेल ओतण्याचे काम करू नये', असे सुनावत पत्रकाराच्या प्रश्नावर त्यांनी संताप व्यक्त केला.

## पिता-पुत्रास रॉडसह कोयत्याने मारहाण


**सोलापूर** : मागील भांडणाचा राग काढून फिर्यादी आणि त्यांचे वडील, भाऊ, आई यांना खलास करतो, म्हणून रॉड, कोयत्याने मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या आईच्या गळ्यातील दीड तोळ्याचे गंठण हरवले.सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

फिर्यादी मन्सूर मोदीन शेख यांना रात्री पावणे दोन वाजण्याच्या सुमारास राहत्या घरी संशयित आरोपी जमीर पटेल, मन्सूर शेख, मंजूर शेख, अल्तमाश पटेल यांनी फिर्यादी, त्यांचे वडील, भाऊ, आई यांना कोयत्याने तर फिर्यादीच्या आई हलीमा शेख यांना मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादीच्या आईच्या गळ्यातील सोन्याचे गंठण कुठेतरी पडून नुकसान झाले.

## निंबर्गीत दुचाकीच्या धडकेने पादचारी महिलेचा मृत्यू

**सोलापूर** : मुलीच्या घरी पायी जात असताना पाठीमागून दुचाकी धडकल्याने ७० वर्षीय वृद्ध महिला गंभीर जखमी होऊन मरण पावली. हा अपघात निंबर्गी (दक्षिण सोलापूर) येथे घडला. गंगुबाई सायबण्णा ख्याडे (वय- ७०, निंबर्गी) असे मयत झालेल्या वृद्धेचे नाव आहे.

सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास त्या घरातून पायी गावातील पाणी टाकीजवळ असलेल्या मुलीच्या घरी निघाल्या होत्या. त्यावेळी पाठीमागून दुचाकी धडकल्याने त्या गंभीर जखमी झाल्या होत्या. त्यांना मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून मुलगी महानंदाने शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारादरम्यान त्या मयत झाल्या. याची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.



### मोदींनी घेतले तिरुपती बालाजीचे दर्शन...

**तेलंगणा** : तेलंगणमध्ये विविध प्रचारसभा घेतल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे तिरुमलामध्ये व्यंकटेश्वर मंदिरात बालाजीचे दर्शन घेतले. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी या मंदिरात बालाजीची विधीवत पूजा केली. तिरुमला व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात जाऊन मोदी यांनी १४० कोटी आरोग्यासाठी, कल्याणासाठी आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली. यावेळी मोदी यांनी पारंपरीक वेश परिधान केला होता.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



याचे कारण फक्त फराळ नक्कीच नाही !


कल्याण
269-76-268

मुंबई
690-55-357


# उगाच कुणीतरी सरकार पडण्याची भाषा करूच नये

सुराज्य/सिंधुदुर्ग

**विरोधी पक्षाच्या रडारवर असलेले विधानसभेचे सभापती राहुल नार्वेकर यांनी सोमवारी आमदार अपात्र प्रकरणी सडेतोड भूमिका स्पष्ट केली. यावर भाष्य करत असताना त्यांनी उद्धव ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे व संजय राऊत यांच्यावर टीकास्त्र सोडले. सरकारने बहुमताचा जादुई आकडा सभागृहात पार केला आहे. सरकार पडायचे असते तर सभागृहातील संख्याबळावर पडले असते, त्यामुळे उगाचच कुणीतरी सरकार पडणार अशी भाषा करू नये,असा टोला नार्वेकरांनी राऊतांना लगावला. आमदार अपात्रतेबाबत योग्य वेळेत निर्णय घेणार असून विधानसभेच्या नियमांची पायमल्ली होऊ देणार नाही, असे देखील नार्वेकर म्हणाले.**

सरकार पडायचे असेल तर ते सभागृहातील संख्याबळावर पडत असते. सभागृहात अविश्वास ठराव झाल्यानंतर संख्याबळ कमी असेल तर ते सरकार पडते. बाहेर कोण बोलतोय म्हणून सरकार पडत नसतं.या सरकारने बहुमताचा जादुई आकडा सभागृहात पार केला आहे आणि तेवढी संख्या असल्याने त्यांनी बहुमताची अग्निपरीक्षा पास केली आहे. उगाचच कोणीतरी असंवैधानिकपणे सरकार पडणार पडणार अशी भाषा वापरू नये, असे नार्वेकर म्हणाले.

## ▪ सभापती नार्वेकर यांनी संजय राऊत, आदित्य ठाकरे यांना लगावला टोला

आमदार अपात्र प्रकरणी नार्वेकर हे वेळकाढूपणा करत आहेत तसेच शिंदे गटाचे १६ आमदार अपात्र ठरणार आणि ३० डिसेंबरपर्यंत महायुतीचे सरकार कोसळणार,असे भाकित



राऊत यांच्यासह आदित्य यांनी केले आहे.यापार्श्वभूमीवर नार्वेकर यांनी पहिल्यांदाच प्रसार माध्यमांशी बोलताना सडेतोड भूमिका व्यक्त केली.

आमदार अपात्रेबाबत वेळेतच निर्णय होणार आहे. सुप्रीम कोर्टाने जो टाईम बाँड दिला आहे. त्यानुसार वेळेत निर्णय द्यायचा माझा विचार आहे. पण कोणत्याही नैसर्गिक न्याय तत्त्वाला धक्का पोहचणार नाही. विधानसभेच्या नियमांची पायमल्ली होऊ देणार नाही. आमदार अपात्रतेबाबत योग्य वेळेत निर्णय घेणार आहे, असे नार्वेकर म्हणाले.

### आदित्य ठाकरेंना टोला

पक्षांतर बंदी कायद्याचे उल्लंघन झाले आहे की नाही याचा निर्णय आदित्य ठाकरेंनी घ्यायचा नाही. निर्णय विधानसभा अध्यक्षांनी घ्यायचा आहे. त्यामुळे उगाच पक्षांतर बंदी कायद्याचा उल्लंघन झालेय अशा प्रकारचे वक्तव्य ठाकरेंनी करू नयेत. जर या कायद्याचे उल्लंघन झाले असेल तर निश्चितच सक्षम विधानसभा अध्यक्ष म्हणून मी निर्णय घेईन. महाराष्ट्रातील जनतेला मी आश्वासीत करतो की, कुठल्या प्रकारचा चुकीचा निर्णय दिला जाणार नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील जनतेने निश्चिंत राहावे, अशा प्रकारचे वक्तव्य करत आदित्य ठाकरे यांना जोरदार टोला लगावला.

### स्थानिक स्वराज्य निवडणुका लांबणीवर

स्थानिक स्वराज्य निवडणुका लांबणीवर पडल्या आहेत. या संदर्भातली याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. सरकारने या निवडणुका लवकर व्हाव्यात असे आपले म्हणणे दिले आहे. परंतु याचा निकाल न लागल्यामुळे या निवडणुका घेता येत नाहीत, असे नार्वेकर म्हणाले.